जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१५९ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# धनंजय मुंडे यांना 'बेल्स पाल्सी' आजार: सलग २ मिनिटेही बोलता येत नसल्याची स्वत:च दिली माहिती

## डोळ्याच्या ऑपरेशननंतर झाले निदान; रिलायन्स हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे अडचणीत सापडलेले राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांना बेल्स पाल्सी नामक आजार झाला आहे. त्यांनी स्वतःच एका पोस्टद्वारे ही माहिती दिली आहे. या आजारामुळे मला साधे २ मिनिटेही व्यवस्थित बोलता येत नाही. त्यामुळे मला कॅबिनेट व पक्षाच्या जनता दरबाराला उपस्थित राहता येत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या पक्षाच्या सर्वच मंत्र्यांना व आमदारांना आपापल्या मतदारसंघातील जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी जनता दरबार घेण्याचे आदेश दिलेत. पण मंत्री धनंजय मुंडे यांनी मागील ६ आठवड्यांपासून एकदाही हा जनता दरबार घेतला नाही. त्यामुळे त्यांनी अजित पवारांच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्याला बेल्स पाल्सी नामक आजार झाल्याची माहिती दिली आहे.धनंजय मुंडे यांनी आपल्या एका पोस्टमध्ये सांगितले की, माझ्या दोन्ही डोळ्यांवर पंधरा दिवसांपूर्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. पद्मश्री डॉ. टी. पी. लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली या शस्त्रक्रिया पार पडल्या. साधारण दहा दिवस त्यांनी डोळ्यांची काळजी विशेषत: तीव्र प्रकाश, धूळ आणि उन्हा पासून काळजी घेण्याचा सल्ला दिला होता.

त्याच दरम्यान मला Bell's palsy नावाच्या आजाराचे निदान झाले. त्याच्यावरील उपचाराचे निदान सध्या रिलायन्स हॉस्पिटल मधील प्रसिद्ध डॉ. अरुण शहा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या आजारामुळे सध्या मला सलग दोन मिनिटही व्यवस्थित बोलता येत नाही. त्यामुळे सध्या एक-दोन कॅबिनेट आणि पक्षाच्या जनता दरबार कार्यक्रमाला मला उपस्थित राहता आले नाही.याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब तसेच आमच्या पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कल्पना दिलेली आहे. लवकरच या आजारावर मात करून मी पुन्हा जनसेवेच्या कामात रुजु होईल, असे ते म्हणालेत.बेल्स पाल्सी ही एक अशी स्थिती आहे, ज्यामध्ये चेहऱ्याचे स्नायू कमकुवत होतात किंवा कोणत्याही स्पष्ट कारणांशिवाय पक्षाघात होतो. चेहऱ्याच्या मज्ञातंतूला हानी झाल्यामुळे हा आजार होतो. या आजारामुळे डोळ्यांना नुकसान, बोलण्यात अडचण आणि चेहऱ्यावरील हावभाव प्रभावित होणे यासारखी गुंतागुंत होऊ शकते. बेल्स पाल्सीची लक्षणे अनेकदा अचानक दिसून येतात. त्यानंतर ३ ते ७ दिवसांत स्थिती गंभीर होते. याची तीव्रता व्यक्तीनुरुप वेगवेगळी असू शकते. काही लोकांना फक्त चेहऱ्यावर काहीशी कमजोरी जाणवते, तर काहींना पूर्ण अर्धांगवायूचा अनुभव येऊ शकतो.बेल्स पाल्सीमुळे रुग्णाच्या चेहऱ्याच्या एका बाजूला अशक्तपणा जाणवतो, संबंधित जागा सुन्न पडल्याचे जाणवते, हसण्यात अडचण येते, गाल फुगतो, डोळ्यांचे कार्य असामान्य होते, प्रभावित बाजूला असामान्यपणे मोठा आवाज ऐकू येतो, डोकेदुखी व मानदुखीही उद्भवते.



# तळीरामांचे पादचारी रस्त्यांवर अड्डे

## खराडीतील चौधरी वस्ती परिसरातील चित्र

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

'विद्येचे माहेरघर' अशी ओळख असलेल्या पुण्यात रस्तोरस्ती 'ओपन बार' सुरू झाल्याचे चित्र आहे. मध्यवस्तीपासून उपनगरांपर्यंत सर्वत्र वाईन शॉपबाहेरच दारू पिण्याचे प्रकार वाढले असून, या मद्यपींची भूक भागविण्यासाठी खाद्यपदार्थांच्या गाड्याही तेथे लागत आहेत.खराडी येथील चौधरी वस्तीकडे जाणार्या पादचारी रस्त्यावर रात्री-अपरात्री दारू पीत बसणारे तळीराम व गर्दुल्ले यांच्यामुळे नागरिक वैतागले आहेत.रस्त्याच्या कडेला बसून दारू पिणार्या तळीरामांना कायद्याचा धाक उरला नाही का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तळीराम रस्त्यांवरून जाणार्या महिलांकडे हावभाव करण्याचे प्रकारही या ठिकाणी घडत आहेत. यामुळे महिलांच्या सुरक्षेसाठी आता पोलीस प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज असून, तळीरामांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. चौधरी वस्तीकडे जाणाऱ्या पादचारी रस्त्यावर रात्री-अपरात्री वाहने उभी करून अनेक वेळा दारू पिणारे युवक दिसून येत आहेत. याचा परिसरातील रहिवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यावर संध्याकाळच्या वेळेस कामावरून घरी जाणाऱ्या महिलांची जास्त वर्दळ असते. या तळीरामांमुळे महिलांना घाबरतच रोज या रस्त्याने जावे लागत आहे. विशेष म्हणजे या तळीरामांच्या दिमतीला खराडी - हडपसर रोडवर खाद्य पदार्थांच्या गाड्याही लागलेल्या दिसतात. पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेऊन या तळीरामांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिक करत आहेत. जिथे जिथे बियर बार अन् देशी दुकाने आहेत त्या परिसरात हिच परिस्थिती आहे.



**पादचारी रस्त्यावरच वाढती व्यसनाधीनता समस्या गंभीर असून, यातून महिला सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलिसांनी या भागात गस्त वाढवावी व दोषींवर कारवाई करावी.**
**- बाळासाहेब पऱ्हाड, सामाजिक कार्यकर्ते, खराडी, पुणे.**

# श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी लि.पेठवडज चे सामाजिक उपक्रम नांदेड जिल्हात अग्रेसर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी लि वतीने अशोकराव डावकोरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पेठवडज ची वाटचाल देवभूमी (देवांची भुमी) या दृष्टिने झपाट्याने प्रगती सुरू असून पेठवडज हे सर्कल मधील सर्वात मोठे लोक वस्तीचे गांव म्हणून सर्व दुर परिचित आहे. या गावत आज घडील हिंदू धर्म तथा मुस्लिम समुदाय, बौद्ध समुदाय या त्रिवेणी धर्म संगमावर आधारित असणारे महामानव तथा देवी-देवताचे एकत्रित दर्शन एकट्या पेठवडज या गावामध्ये दिसुन येते. या गावात विविध जाती धर्मांचे लोक एकोप्याने राहातात अन वर्षाचे बाराही महिने विविध देवतांचे जानेवारी ते डिसेंबर दरम्यान असंख्य अन्नदान तथा भक्तीमय वातावरणात सप्ताह सण उत्सव साजरे होतात. यात एक नाविन्यपूर्ण बाब म्हणजेच श्री बालाजी फिल्डवेअर सोसायटी पेठवडज या संस्थेने शाळा, दवाखाना तथा इत्यादि क्षेत्रामध्ये मानधन तत्वावर कर्मचारी नेमून तसेच गावातील प्रत्येक मंदिरांना लाखो रूपयांचे आर्थिक सहकार्य केले आहे त्यामुळे सर्वसामान्य लोकांवर येणारे आर्थिक ताण एकट्या सोसायटी ने घेतल्यामूळे सामाजिक एकता तथा अध्यात्मिक ज्ञान यांना निश्चितच पोषक वातारण निर्माण झाले आहे.या कार्याची सर्व दुर चर्चा होऊन पेठवडज च्या आसपास गावातील लोकांनी बालाजी फिल्डवेल सोसायटी लि पेठवडज च्या उपक्रमाचे अनुकरण करण्यास सुरूवात झाली असून श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी पेठवडज ही नांदेड जिल्हामध्ये अग्रेसर ठरली आहे.यांचे सर्व श्रेय सोसायटीच्या अध्यक्षा सौ सुनिता अशोकराव डावकोरे व तांत्रिक सल्लागार श्री अशोकराव श्यामराव डावकोरे साहेब यांचें असून त्याचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.



# लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात

## खा.अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते विविध कामांचे भूमिपूजन




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अर्थात झच-णडक- अंतर्गत लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबादला पाच कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. या अंतर्गत मुलांचे नवीन वसतिगृह, मुलींच्या वसतिगृह नूतनीकरण, सांस्कृतिक सभागृहाचे नूतनीकरण, नवीन व्यायाम शाळेचे नूतनीकरण, पाच खउढ वर्ग खोल्या मंजूर झाल्या आहेत. अशा विविध बांधकामाचे भूमिपूजन संस्थेचे अध्यक्ष तथा खा. अशोकरावजी चव्हाण यांच्या हस्ते संपन्न झाले. खा. अशोकाराव चव्हाण या भूमिपूजन सोहळ्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थितांना संबोधित करतांना म्हणाले की, माझे लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय हे तेलगू आणि मराठी भाषेच्या सीमेवर आहे. महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता आणि पायाभूत विकासासाठी निधी कमी पडून देणार नाही. या परिसरातील विद्यार्थ्यांनी येथील शिक्षणाचा पुरेपूर लाभ घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले. या भूमिपूजन सोहळ्यास धर्माबाद परिसरातील निमंत्रित, प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, पालक, शेतकरी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर कनसे यांनी केले. तसेच संस्थेचे सचिव डॉ. कमलकिशोर काकानी यांनी सुद्धा उपस्थिताना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला संस्थेचे सहसचिव वर्णी नागभूषण, कोषाध्यक्ष महेंद्र कुमार पांडे, संचालक विश्वनाथराव पाटील बन्नाळीकर, श्री उमेश कुमार झंवर, नागनाथराव नोमूलवार, विश्वस्त रामशेठ चिंतावार, धर्माबाद शिक्षण संस्थेचे संचालक, सभासद, पदाधिकारी व तसेच उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, दत्ताहरी पाटील चोळाखेकर, गणेशराव पाटील करखेलीकर, मोईजसेठ करखेलीकर यासह महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर जाधव तर आभार डॉ.सुनीलचंद्र सोनकांबळे यांनी केले.

### छत्रपतींचे विचार आत्मसात करून आचरण करणे काळाची गरज

# युवकांना छत्रपतींचा खरा इतिहास कळणे काळाची गरज-पत्रकार संदिप जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

सह्याद्रीच्या कुशीत जन्मलेल्या थोर छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आचार हे संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी वंदनीय असून त्यांनी कधीही भेदभाव केलेला नाही.त्यांच्या विचारांचा अंगिकार करून प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष पत्रकार संदिप जाधव यांनी केले. छत्रपती भोसले राजे प्रतिष्ठान व भाजप उद्योग आघाडी यांच्यावतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. या कार्यक्रमात छत्रपतींचे विचार समाजात रुजवण्यासाठी १००० शिवमूर्त्यांचे वाटपही करण्यात आले. यासह छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फोटोचे अनावरणही करण्यात आले. याचबरोबर येथे गरजूंसाठी मोफत आरोग्य शिबिरही जयंतीनिमित्त राबवण्यात आले.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून भाजप उद्योग आघाडीच्या सरचिटणीस श्रध्दाताई कंडूडे उद्घाटक म्हणून शिवसेना नेते दिनेशजी मालपे उद्योजक प्रतापराव साळुंखे, लोकशाही परिवाराचे भागवतजी वैद्य व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमात बोलताना पत्रकार संदिप जाधव म्हणाले, अखंड भारतात असा जाणता राजा महाराष्ट्राने दिला. त्यांनी आपल्या तलवारीच्या जोरावर अनेक गड किल्ले ताब्यात घेऊन गनिमी काव्याने औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूला धूळ चारली त्यांचे विचार अंगीकार करून आचरण करावे असे आवाहन पत्रकार जाधव यांनी यावेळी बोलताना केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी छत्रपती भोसले राजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष लक्ष्मण भोसले, बालाजी सूर्यवंशी, मनमोहन तोमर, व त्यांच्या टीमने अथक परिश्रम घेतले.



# अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या तालुका उपाध्यक्षपदी आस्मा शेख

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या बिलोली तालुका उपाध्यक्षपदी आस्मा शेख यांची निवड जिल्हा अध्यक्ष शंकरराव मावलगे यांच्या आदेशानुसार बिलोली तालुकाध्यक्ष राजाबाई भरांडे यांच्या हस्ते बिलोली येथील जनसंपर्क कार्यालय येथे निवड करण्यात आली.

भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती महिलांच्या न्याय हक्कासाठी लढणारी संघटना असुन, भ्रष्टाचाराला आळा घालण्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून करत आहे. यावेळी सोशल मिडियाचे जिल्हाध्यक्ष सय्यद रियाज, शिवानी देशमुख, शेख गणी सह अनेक जन उपस्थित होते.



# दिल्लीच्या मुख्यमंत्री-सौ.रेखा गुप्ता महिला सबलीकरणाचे उत्तम उदाहरण!

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाने सौ. रेखा गुप्ता यांची दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी निवड करून महिला नेतृत्वाला मोठी संधी दिली आहे. या निर्णयामुळे केवळ दिल्लीच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात झाली नाही, तर महिला सक्षमीकरणाचे उत्तम उदाहरण निर्माण झाले आहे. दिल्लीत यापूर्वीही महिला मुख्यमंत्री होत्या–सुषमा स्वराज (भाजप), शीला दीक्षित (काँग्रेस), आणि अलिकडे काही काळ 'आप'च्या आतीशी. मात्र, भाजपाने पहिल्यांदाच एका महिलेला मुख्यमंत्रीपदावर संधी दिली असून, हा निर्णय विचारपूर्वक घेतला गेला आहे.

रेखा गुप्ता यांनी विद्यार्थी संघटनेतून राजकीय प्रवास सुरू केला. दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघटनेच्या (ऊगडण) अध्यक्षपदावर निवडून आल्यापासून, त्यांनी नगरसेविका, महापौर पदाची उमेदवारी, आमदारपद असा प्रवास केला आहे. तळागाळातील कार्यकर्त्यांनाही मोठ्या संधी मिळू शकतात, याचे हे उदाहरण आहे.

मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यानंतर त्या दिल्लीच्या विकासासाठी विविध योजना राबवू शकतात. महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष गस्त पथके तैनात करण्याचा निर्णय घेऊ शकतात, सार्वजनिक ठिकाणी अधिक सीसीटीव्ही बसवण्यावर भर देतील आणि जलदगती न्यायासाठी विशेष महिला न्यायालये स्थापन करण्याचा विचार करू शकतात. नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी त्या स्वच्छ पाणी आणि वीजपुरवठा सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित करतील. वाहतुकीच्या सुविधांचे आधुनिकीकरण आणि स्वच्छ दिल्ली अभियान राबवण्याची शक्यता आहे. तसेच, शिक्षण आणि



आरोग्य क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी सरकारी शाळांची गुणवत्ता वाढवण्यावर भर देतील, नवीन महाविद्यालये आणि तंत्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न करतील आणि सरकारी रुग्णालये अधिक सुसज्ज करण्यासाठी काम करतील.

दिल्लीतील व्यापारी आणि लघु उद्योजकांसाठी त्या सुलभ कर्जव्यवस्था सुरू करण्याचा प्रयत्न करू शकतात आणि नव्या व्यवसायांना चालना देण्यासाठी अनुकूल धोरणे तयार करू शकतात. पर्यावरणाच्या दृष्टीने, वायुप्रदूषण कमी करण्यासाठी कठोर उपाययोजना राबवण्याचा विचार करतील आणि हरित क्षेत्र वाढवण्यासाठी नवीन प्रकल्प हाती घेऊ शकतात.भाजपासाठी त्यांच्या निवडीचे मोठे राजकीय महत्त्व आहे. दिल्लीसारख्या शहरात एका महिलेला मुख्यमंत्री पदावर संधी देऊन, भाजपाने सबका साथ, सबका विकास या तत्त्वाला मूर्त स्वरूप दिले आहे.

डॉ. सुवर्णा कराड, वंजारी महासंघ महिला आघाडीच्या महाराष्ट्र राज्याध्यक्षा, यांनी रेखा गुप्ता यांचे दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले. त्या म्हणाल्या, भाजपाने एका कर्तृत्ववान आणि तळागाळातील महिला नेतृत्वाला मुख्यमंत्री पदाची संधी देऊन महिलांसाठी एक नवा आदर्श निर्माण केला आहे. सौ. रेखा गुप्ता यांचे हार्दिक अभिनंदन! त्यांच्या नेतृत्त्वाखाली दिल्लीचा विकास अधिक वेगाने होईल आणि महिला सक्षमीकरणाला नवा ध्यास मिळेल.रेखा गुप्ता यांच्या नेतृत्त्वाखाली दिल्लीच्या भविष्यासाठी नवीन दिशा ठरवली जाईल, अशी अपेक्षा आहे. त्यांच्या कार्यकाळात दिल्लीच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, हे निश्चित. त्यांचे हार्दिक अभिनंदन!

**–डॉ. सुवर्णा कराड, प्रदेशाध्यक्ष**
**वंजारी महासंघ,**
**महिला आघाडी महाराष्ट्र राज्य..**

## कंधार येथील प्रा.ज्ञानेश्वर गायकवाड आज आकाशवाणी केंद्रावर

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील प्रसिद्ध कवी प्रा.ज्ञानेश्वर गायकवाड यांचं काव्यवाचन आज दि.२१ फेब्रुवारी रोजी सकाळी १०:४५ वाजता आकाशवाणीच्या नांदेड केंद्रावरुन 'लोकजागर' या कार्यक्रमात प्रसारित होणार आहे.या कार्यक्रमाचा श्रोत्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी विश्वास वाघमारे,प्रसारण अधिकारी राहुल आत्राम आणि वरिष्ठ निवेदक गणेश धोबे यांनी केले आहे.



आजपर्यंत त्यांचे पिंपळवाट तू येशील म्हणून कैफियत हे तीन कवितासंग्रह चिंतन हा लेखसंग्रह तर सम्यक हा प्रातिनिधिक कवितासंग्रह (संपादित) अशी पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.कविता,समीक्षा, ललित लेखन आदी वाङ्.मय प्रकारात त्यांनी लेखन केले असून त्यांचे प्रासंगिक लेखनही प्रसिद्ध झाले आहे.अनेक साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून त्यांचा सहभाग राहिलेला आहे.प्रा.ज्ञानेश्वर गायकवाड यांच्या कवितेला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासह राज्य,राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान प्राप्त झाला आहे.

## आज आष्टीत प्रसिद्ध सिने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांचा न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा कार्यक्रम होणार

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यातील जामगावचे सरपंच युवा नेते राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.दि.२० फेब्रुवारी रोजी मुलामुलींच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे डॉ.वसंत हंकारे यांचे व्याख्यान संपन्न झाले तर आज शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबिर,न्यू होम मिनिस्टर यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती






राधेश्याम धस मित्र मंडळाच्यावतीने देण्यात आली आहे.आष्टी तालुक्यातील जामगावचे सरपंच तथा युवा नेतृत्व राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.यंदाही दि.२० फेब्रुवारी गुरुवार रोजी सायंकाळी ७ वाजता आष्टी शहरातील पंचायत समिती प्रांगणात आई-वडील मुल-मुली यांच्या नात्यातील सुंदर व्याख्या सांगणारे व संपूर्ण कुटुंबांनी एकत्रित येऊन ऐकावे असे प्रेरणादायी प्रा.वसंत हंकारे यांचे व्याख्यान संपन्न झाले.तर आज शुक्रवार दि.२१ रोजी सकाळी ९ वाजता भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले आहे.सायंकाळी ६ वाजता प्रसिद्ध सिने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांचा न्यू होम मिनिस्टर खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन राधेश्याम धस मित्र मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# जेष्ठ प्रबोधनकार 'कवी' महादेव लांडगे आष्टी जिल्हा बीड काव्यवाचन स्पर्धेत प्रथम

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी,बीड जिल्ह्याचे जेष्ठ प्रबोधनकार 'कवी' महादेव लांडगे यांनी नुकत्याच झालेल्या काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे.त्यांच्या उत्कृष्ट काव्य सादरीकरणामुळे त्यांना ही प्रतिष्ठित मान्यता मिळाली. स्पर्धेमध्ये अनेक स्पर्धक सहभागी झाले होते,परंतु महादेव लांडगे यांचे सृजनशीलतेने आणि आत्मविश्वासाने केलेले सादरीकरण स्पर्धकांमध्ये उठून दिसले.

आयोजक कवी कुमोद रणदिवे एक मैफिल कवितांची साहित्य मंच महाराष्ट्र राज्य यांनी सत्यशोधक विचार मंथन आश्रम पिंपरी कोलंदर तालुका श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर येथे आयोजित केलेल्या काव्यवाचन स्पर्धेत महादेव लांडगे आष्टी जिल्हा बीड यांनी सर्वप्रथम तर कुमारी ऐश्वर्या हैदराबाद हिने द्वितीय क्रमांक पटकावला प्रथम क्रमांकाला शाल सन्मानचिन्ह व रोख रक्कम रुपये २२२२ असे पारितोषिकाचे स्वरूप होते.

ज्येष्ठ प्रबोधनकार 'कवी'महादेव लांडगे आष्टी,जिल्हा बीड यांनी नुकत्याच आयोजित



करण्यात आलेल्या काव्यवाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.त्यांच्या प्रबोधनात्मक आणि प्रेरणादायी काव्यामुळे त्यांना ही मान्यता मिळाली आहे.महादेव लांडगे हे त्यांच्या सशक्त विचारांमुळे आणि उत्कृष्ट काव्यलेखनामुळे ओळखले जातात.

कार्यक्रमाचे उद्घाटन ह.भ.प. बाळासाहेब महाराज धोत्रे (सत्यशोधक विचारमंथन आश्रम पिंपरी कोलंदर)यांनी केले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाराष्ट्रात गाजलेले कवी ज्येष्ठ साहित्यिक गझलकार माननीय रज्ज़ाक शेख यांनी भूषविले.प्रास्ताविक कवी नितीन रणदिवे यांनी केले. सूत्रसंचालक म्हणून १ कवी आनंद डोळस २ कवी नितीन रणदिवे यांनी काम पाहिले तर परीक्षक म्हणून महाराष्ट्रात गाजलेले कवी माननीय सागर जी काकडे यांनी उत्तम परीक्षण केले.कवी नितीन रणदिवे यांनी आभार प्रदर्शनाचे काम केले यावेळी अमरावती यवतमाळ गोंदिया बार्शी पुणे मुंबई बीड ठाणे अहिल्यानगर हैदराबाद अशा विविध भागातून एका पेक्षा एक वरचढ कवी उपस्थित होते कार्यक्रम व्यवस्थित पार पडावा म्हणून एक मैफिल कवितांची साहित्य मंच महाराष्ट्र राज्य यांच्या टीमने खूप प्रयत्न केले.

# पहिली अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद जवळा फकीर येथे मोठ्या हर्ष उत्साहात संपन्न

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**बीड । विजय रोडे**

धारूर तालुक्यातील जवळा फकीर येथे दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या धम्म परिषदेस मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिका उपस्थित असल्याचे पहावयास मिळाले. धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथे संपन्न झालेल्या पहिल्या धम्म परिषदेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ भदंत उपगुप्त महाथेरो पूर्णा हे उपस्थित होते. पहिल्या सत्रामध्ये पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण त्रिशरण पंचशील ग्रहण करून करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण धम्म परिषदेचे मुख्य आयोजक भदंत पयातीस महा थेरो यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते. पहिल्या धम्म परिषदेचे आयोजन जवळा फकीर येथील मृगदयावान महाविहार बौद्ध धम्मसंस्कार शिक्षण संस्था जवळा फकीर तालुका धारूर जिल्हा बीड येथे करण्यात आले होते. या संस्थेच्या उभारणीसाठी परिसरातील गवळी नामक शेतकऱ्यांनी स्वतःची एक एकर जमीन ही दान म्हणून दिलेली आहे. त्याच जागेवर या अखिल भारतीय धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी प्रत्येक पौर्णिमेला कार्यक्रम घेण्यात येतो, या ठिकाणी धम्म हॉलची उभारणी देखील सध्या सुरू आहे.





धम्म परिषदेचे प्रस्ताविक आयोजक भदंत पय्यातीस महाथेरो यांनी केले. तर भदंत उपगुप्त महाथेरो पूर्ण, भदंत इंदूवस महाथेरो,भदंत पयारत्न थेरो, भदंत भैय्या बोधि थेरो, भदंत पयानंद थेरो भिकू संघरत्न हे होते, तर उपस्थितीमध्ये प्रा. प्रदीप रोडे आले होते. तर धम्मदेशना कार्यक्रम भोजनदानाच्या नंतर संपन्न झाली. त्यापूर्वी उपस्थित भिकू संघाचे स्वागत व सत्कार करण्यात आला. यावेळी भदंत पयानंद यांनी धम्मदेशना देते प्रसंगी श्रीलंकेमधील भंते यांनी एका पादरीस स्वतःची किडनी दान करून दान परमिता ही कशा पद्धतीने असते हे सांगितले, ज्यामध्ये सदरील भंते यांना दान करायचे असताना एका पादरीस किडनीची आवश्यकता होती. तर भंतेंनी त्यांना किडनी दान दिली यावेळी पादरींचे बंधू हे डॉक्टर असल्या कारणाने त्यांना लागलीच कळाले की त्यांच्या भावाला पण त्यांनी किडनी दान दिली आहे, तर भत्तेना डॉक्टर बंधुने चार लाख रुपयांची भेट देण्याचे ठरवले परंतु भंतेंनी जर चार लाख रुपये घेतले तर दानपरमिता पूर्ण होणार नाही म्हणून ती भेट नाकारली या पद्धतीनेच दानपरिमितेचे महत्त्व भदंत पयानंद यांनी उपस्थित उपासक उपासिकांना सांगितले तसेच मृगदयावान महाविहारास परिसरातील नागरिकांनी धम्मदान देऊन विहारात आपले मोलाचे असे योगदान द्यावे असेही सांगितले. धम्म परिषद यशस्वी करण्यासाठी माजी शिक्षक रोहीदास मोतिराम गवळी अनिता रोहीदास गवळी,जानकीराम मोतिराम गवळी, लताबाई जानकीराम गवळी,पो.पा.लिबाजी चागुजी गवळी, पवित्राबाई लिंबाजी गवळी,नरहरी चागुजी गवळी, गंगाबाई नरहरी गवळी,साधु कांबळे,साखरबाई साधु कांबळे,माजी शिक्षक दिलीप पंढरी कांबळे धाराशिव आदींचे सहकार्य लाभले. न्यूज २३ मराठीचे संचालक गणेश शिंदे यांनी संपूर्ण धम्म संपूर्ण फेसबुक वरून लाईव्ह प्रसारित केली.

जमीन दानदाते

प्रभाकर सोनबा गवळी व शांतिप्रिया प्रभाकर गवळी यांनी १ एकर जमीनदान दिली.तर अन्नदान दान – रुक्मिणी पंढरीनाथ हिरवे व पंढरीनाथ सखाराम हिरवे यांच्या कुटुंबीयांकडून पहिल्या अखिल भारतीय बौद्ध धम्मपरिषदेसाठी आलेल्या सर्व उपासक उपासिकांसाठी अन्नदान करण्यात आले व भिकू संघाला भोजनदान लताबाई भाऊराव गवळी यांनी दिले. आश्रुबा सौंदरमल यांनी धम्म परिषदेमध्ये पिण्याच्या पाण्याच्या जार व्यवस्था त्यांनी केली. धम्म परिषदेसाठी लावण्यात आलेल्या सर्व होर्डिंग बॅनरचे दान डॉ.संजय नाकलगावकर दिले. बीडच्या स्नेहल रमेश खंडागळे यांनी गोदरेजचे कपाट दान दिले तसेच उपस्थित अनेकांनी धम्मप्रेमी बांधवांनी यावेळी रोख स्वरूपात धम्मदान दिले आहे .

# राजमाता जिजाऊ वस्तीगृहात शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

मुखेड शहरातील नामांकित राजमाता जिजाऊ वस्तीगृहामध्ये शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एम.डी रेडिओलॉजिस्ट आद्या डायग्नोस्टिक सेंटरचे संचालक डॉ श्रीहरी बुडगेमवार, तर प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ.कैलास पाटील चांडोळकर, ऍड.गोविंद पाटील डुमने, फिजिओथेरपिस्ट डॉ. ओमकार मांजरीकर, कवी साहित्यिक शिक्षक, संतोष तळेगावे सर,जाधव सर ,सचिन मेनकुदळे नारळीचे सरपंच भुजंग देवारे आदी मान्यवरांची उपस्थिती होती .

प्रथमता सर्व मान्यवरांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. राजमाता जिजाऊ वस्तीगृहाचे संचालक गंगाधर बिरादार सर यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर भाषणे केली. उत्कृष्ट भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यांत निलेश फिरंगवाड, पांडुरंग वडेर, श्रीकांत वडजे,तिरुपती देवकते, निरंजन वडजे, व तसेच काही चिमुकल्या मुलींनी बहारदार अशी भाषणे केली. त्यामध्ये गार्गी बिरादार या मुलींने इंग्रजी मध्ये भाषण केले तर अमृता पांचारे या चिमुकलीने राजमुद्रा म्हणून त्याचे मराठीत अनुवाद करून सांगितले. गौरी पांचरे ने सुद्धा छान भाषण केले. या सर्व विद्यार्थ्यांच्या बहारदार भाषणानंतर सर्वत्र शिवमय वातावरण तयार झाले . यावेळी सुप्रसिद्ध कवी संतोष तळेगावे सरांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा उत्कृष्ट असा पाळणा सादर केला व सर्वाच्या टाळ्यां मिळविल्या.

उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषण करताना ड. गोविंदराव डुमणे पाटील म्हणाले की , आजच्या युगात तलवारीची गरज नसून खरी गरज ही पेन आणि पुस्तकाची आहे .छत्रपती शिवाजी महाराजांनी तलवारीच्या



पातीवर स्वराज्य निर्माण केले .आजच्या युगातील विद्यार्थ्यांनी पेन आणि पुस्तक रुपी आयुधाचा वापर करून परिश्रमाने व ज्ञानाच्या जोरावर आधुनिक गडकिल्ल्याप्रमाणे,ख–ड, खझड, झडख, तहसीलदार , डॉक्टर , इंजिनियर , अभियंता ,न्यायाधीश, अशा महत्त्वाच्या पदावर गेलं पाहिजे.आई– वडिलांच्या कष्टाची, परिश्रमाची आठवण ठेऊन विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतलं पाहिजे असे प्रतिपादन डूमणे यांनी केले.

अध्यक्षीय समारोप करताना डॉ .बुडगेमवार सर आपल्या भाषणात म्हणाले की , शब्दही अपुरे पडती.. अशी शिवबाची कीर्ती ! राजा शोभूनी दिसे जगती. अवघ्या जगाचे शिवछत्रपती ! सर्वांनी स्त्रियांचा सन्मान केला पाहिजे, छत्रपती शिवाजी महाराजांना लहानपणी माँसाहेब जिजाऊंनी थोर महापुरुषांच्या कथा सांगून शिकवण व प्रेरणा दिली. तीच आईची प्रेरना घेऊन शिवबांनी पुढे जाऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी युद्ध, कौशल्याच्या बळावर , गनिमी काव्याने , बुद्धीचा चातुर्य दाखवून कठीण प्रसंगातून मार्ग काढला. त्यामुळेच शत्रू सैन्य बलाढ्य असून ही मुठभर मावळ्यांच्या एकजूटीने अनेक गडकिल्ले जिंकून विजय मिळविला. शक्तीपेक्षा युक्ती कधीही श्रेष्ठ ठरते. हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. शिक्षणामुळे आपले आयुष्य बदलू शकते शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. नेहमी मोठे स्वप्न पहा आणि स्वप्नपूर्तीसाठी मेहनत व परिश्रम करा म्हणजे यश मिळेल असे प्रतिपादन डॉ. बुडगेमवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. अमुल्य वेळ देऊन उपस्थित राहिल्याबद्दल संचालक गंगाधर बिरादार यांनी मान्यवरांचे आभार मानले. कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी वस्तीगृहातील सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले होते. कार्यक्रमाचे सुंदर व बहारदार असे सुत्रसंचलन गंगाधर बिरादार सर यांनी केले.

# शिवराज पाटील वडजे यांनी शिवजयंतीच्या निमित्ताने सलग बारा तास शिवचरित्र केले वाचन



लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । किरण वडजे**

कंधार तालुक्यातील मसलगा येथिल रहिवाशी व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे भाषा संकुलात सारथी संशोधक विध्यार्थी शिवराज वडजे पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने सलग १२ तास (सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) शिवचरित्र वाचुन जयंती साजरी केली व शिवचरित्र वाचण्याचा संकल्प पुर्ण केला. हा आगळा वेगळा प्रयत्न नक्कीच तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. शिवराज पाटील वडजे हे नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असतात व सामाजिक कार्यातून चळवळ गतिमान करण्यासाठी प्रयत्नशील असतात. या उपक्रमाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# स्वयंभू महादेव मंदिर पेठवडज येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

स्वयंभू महादेव मंदिर संस्थान पेठवडज येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सुरूवात झाली आहे..तरी सर्व गावातील व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांना कळवण्यात आनंद होतो की प.पु. गुरुवर्य देवपुरी महाराज कहाळेकर व प.पु. गुरुवर्य नामदेव महाराज उंब्रजकर यांच्या कृपाशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताहाला सुरूवात झालेली आहे सप्ताहाच्या कार्यक्रमाची रूपरेषा.सकाळी ४ ते ६ काकडा आरती,७ ते ९ शिवलिला अमृत पोथी पारायण,दु.११ ते १ गाथा भजन, ४ ते ५ प्रवचन,६ ते ७ हरीपाठ,८ ते ९ वैराग्यमूर्ती निवृत्ती महाराज पेंडू यांच्या ग्रंथ ,९ ते.११ हरी किर्तन ११ ते २ हरी जागर सप्ताहातील किर्तनकार २० फेब्रुवारी




२०२५ वार गुरुवार.ह.भ.प. परमेश्वर महाराज शहापूरकर ,२१ फेब्रुवारी वार शुक्रवार ह.भ.प.घनश्याम महाराज बेटकर, २२ फेब्रुवारी वार शनिवार ह.भ.प.गुरु वीरभद्र स्वामी महाराज येलुरकर ,,२३ फेब्रुवारी वार रविवार ह.भ.प. गंगाधर महाराज फड परळी वैजनाथ,२४ फेब्रुवारी वार सोमवार ह.भ.प. बालाजी महाराज संभाजीनगर, २५ फेब्रुवारी वार मंगळवार हा.भ.प. रामदास महाराज, २६ फेब्रुवारी वार बुधवार ह.भ.प. पंडु महाराज हाडोळीकर ,२७ फेब्रुवारी वार गुरुवार काल्याचे किर्तन कीर्तनकार.ह.भ.प.पंडु महाराज हाडोळीकर यांचे होणार आहे. भजनी मंडळ. विठ्ठलेश्वर भजनी मंडळ व समस्त भजनी मंडळ आपले आयोजक स्वयंभू महादेव मंदिर संस्थान पेठवडज व समस्त गावकरी मंडळी पेठवडज ता.कंधार जि नांदेड यांनी आवाहन केले आहे.अमृतमय ज्ञानाचा आस्वाद घ्यावा असे प.पु.गुरूवर्य देवपुरी महाराज व प.पु.गुरूवर्य नामदेव महाराज उंब्रजकर यांनी सांगितले आहे.

# आळंदी शहरात महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी सुरक्षा दलाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आळंदी देवाची । इर्मान हकीम**

महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल संलग्न महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी सुरक्षा दल यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सव गुरुनाथ मंगल कार्यालय आळंदी या ठिकाणी साजरा करण्यात आली, प्रथम प्रतिमा पूजन आळंदी नगरपरिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी मा.कैलास केंद्रे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले, या कार्यक्रमाला उपस्थित, शिवचरण सर आळंदी नगरपरिषद, ग्रामीण रुग्णालयाचे डॉ.सुहास ढेकणे सर,एडवोकेट एस एस आघाव,पुणे जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्षःमोहंम्मद हकीम,पुणे जिल्हा महिला अध्यक्षा सौ.निलम सोनवणे,खेड तालुका अध्यक्षाःसौ.स्वाती शिंदे,आळंदी शहर



बचत गट संघ अध्यक्षाःसौ.सुवर्णा काळे, आळंदी नगरपरिषद पथविक्रेता समिती सदस्याःकाजल धोंडगे आळंदी शहर मार्गदर्शिका,मंगल कोळी,गणेश काळे,शंकर गुंजाळ,बाबू आवारे,हनुमंत पवार,बाबा सुतार,आल्हाट सर,तुकाराम बोडरे,अरुण वावरे,निलेश ढोकणे,बाळासाहेब जाधव,सचिन काळे,राहुल रायबोले,गजानन मिटकरी,शामराव सोनवणे,धनाजी मेत्रे,गणेश खांडे,गुप्ताजी,भाजी मंडई शाखा,झाडी बाजार शाखा, इंद्रायणी घाट शाखा,तसेच आळंदी शहरातील सर्व पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते या कार्यक्रमात सुप्रसिद्ध गायक,कीर्तनकार सार्थक जी शिंदे यांचे व्याख्यान झाले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुणे जिल्हा अध्यक्ष संतोष सोनवणे यांनी केले तर आभार


महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी सुरक्षा दल आळंदी शहर सचिवःस्वाती पाटील यांनी मानले.शिवजयंती महोत्सव समिती प्रज्ञा गरड ,योगिता गनमोठे,स्वाती आहेर,आकांक्षा गायकवाड ,उषा सातपुते ,आरोही पवार ,खुशी घोडके हा जयंती सोहळा तृतीयपंथी समुदायाच्या वतीने आयोजित करण्यात आल्यामुळे आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मा.कैलास केंद्रे साहेब यांनी त्यांचे विशेष कौतुक केले, तसेच एडवोकेट एस एस आघाव यांनी तृतीयपंथी समुदायासाठी सर्वोच्च न्यायालय केंद्र शासन आणि राज्य शासनाने भक्कम असे कायदे केलेले आहेत त्यामुळे तुम्ही काळजी करू नका आम्ही सर्व तुमच्या सोबत आहोत असे आपल्या मार्गदर्शनात सांगितले, सुप्रसिद्ध गायक आणि कीर्तनकार सार्थक जी शिंदे यांनी आपल्या व्याख्यानात छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार सांगत उत्तम असे प्रबोधन केले.

# संत गजानन महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त कंधार येथे कार्यक्रम

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

श्री योगीराज गजानन महाराज यांच्या १४७ व्या प्रकट दिन निमित्त दि,२० फेब्रुवारी रोजी प्रकट दिन असतो.कंधार येथील डॉ गजानन अंबेकर यांच्या श्री गजानन प्रसुतीगृह व बालरूणालयात १४७ वा प्रकट दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्य मा.आमदार भाई डॉ.गुरुनाथराव कुरूडे,मा. आमदार ईश्वररावजी भोसीकर,अशोक अंबेकर,पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक यांच्या सह अनेक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला,डॉ.गजानन अंबेकर व सौ.डॉ.वसुधा अंबेकर यांच्या वतीने दरवर्षी श्री संत गजानन महाराज यांचा प्रकट दिनानिमित्त विविध कार्यक्रमाने साजरा केला जातो.दि २० रोजी सकाळी गजानन महाराज यांच्या मूर्तीस महाभिषेक, महापूजा करून महाप्रसाद वाटप करण्यात आले,यावेळी मंदिराची फुलांनी सजावट करण्यात आली आकर्षण विद्युत रोषणाई करण्यात आली,



तसेच यावेळी डॉ.रामभाऊ तायडे,डॉ.दिपाली तायडे,ड मारोती पंढरे,डॉ.संजय केंद्रे,डॉ.लक्ष्मीकांत पेठकर,डॉ.ज्ञानेश्वर केंद्रे,डॉ.बालाजी कागणे,किशोर अंबेकर,डॉ.बालाजी मद्रेवार,ज्ञानेश्वर उगले,व्यापारी वैभव काप्रतवार, शेख रशीद,महमंद सिंकदर, बसवेश्वर मंगनाळे,राजहंस शहापुरे, पत्रकार दिगांबर वाघमारे,योगेंद्रसिंह ठाकुर,धोंडीबा मुंडे,मयुर कांबळे,शुभम केंद्रे,संभाजी कांबळे,राजरत्न गायकवाड, आर्दीसह भाविक भक्तांची यावेळी उपस्थिती होती .

# देगलूर येथे सार्वजनिक छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

इतिहासाच्या पानावर, रयतेच्या मनावर, मातीच्या कणावर, आणि विश्वासाच्या प्रमाणावर, राज्य करणारा राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त देगलूर शहरासह तालुक्यातील ठिकाणी जयंती उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा समोर शिवजन्मोत्सव समिती व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय भव्य कृषी प्रदर्शन, शिवचरित्रावर आधारित कीर्तन, शेतकऱ्यावरती कृतज्ञत व्यक्त करण्यासाठी प्रगतिशील शतकऱ्यांचा शिवरत्न सन्मान सोहळा, सांस्कृतिक कार्यक्रम महाराष्ट्र लोककलेवर आधारित विविध शाळेतील विद्यार्थ्यांची समूह नृत्य स्पर्धा व पारितोषक वितरण सोहळा व्याख्यान विविध कार्यक्रमा आयोजित करण्यात आले छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा परिसरात भव्य विद्युत रोषणाई करण्यात आली होती तसेच शहरात अनेक ठिकाणी जयंती निमित्त शुभेच्छाचे कट आउट व बॅनर लावण्यात आले होते शिवरायास अभिवादन करण्यासाठी शिवभक्तांची मोठी गर्दी होती. यावेळी आमदार जितेश अंतापुरकर यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास क्रेनच्या साह्याने पुष्पहार घालण्यात आले.

देगलूर येथील खुशी सेवाभावी संस्थेच्या वतीने महाप्रसाद खीर, भात, वरण, भाजी, चपाती अशा पंच पक्वान अन्नदानाचे आयोजन यशस्वीपणे संपन्न झाले खुशी सेवाभावी संस्थेचे सर्वेसर्वा अध्यक्ष श्री बबलू टेकाळे यांच्या पुढाकाराने झालेल्या या उपक्रमाला हजारो



शिवभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व मुस्लिम बांधवांच्या वतीने शुद्ध पाणी वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी राजकीय, सामाजिक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते या शिवजन्मोत्सव निमित्त पारंपारिक वेशातील महिलांनी व शिव गीत पाळणा गायन शिवश्री डॉ. सुनील जाधव यांनी गायला सिंहाची चाल, गरुडाची नजर, स्त्रियांचा आदर, शत्रूचे गर्दन असावे मावळ्याचे वर्तन, होय छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण या रयतेच्या राजाला जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने मावळ्यांची गर्दी केली होती.

या कार्यक्रमास खासदार रवींद्र चव्हाण, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार जितेश अंतापुरकर, शिवाजी देशमुख बळेगावकर, अ‍ॅड. प्रितम देशमुख, शिवस्मारक समितीचे अध्यक्ष अंकुश देसाई, माजी नगराध्यक्ष शंकरराव कंतेवार, मोगलाजी शिरसेटवार, लक्ष्मीकांत पदमवार, माजी सभापती माधवराव मिसाळे, अँड. रामराव नाईक, उप जिल्हाधिकारी अनुप पाटील, तहसीलदार भरत गट विकास अधिकारी शेखर देशमुख, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, उपाधीक्षक संकेत गोसावी, पोलीस निरीक्षक मारुती मुंडे, निवृती कांबळे सांगलीकर, बालाजी पाटील थडके, शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष मंगल पाटील, अशोक कांबळे, भाजपाचे शहराध्यक्ष प्रशांत दासरवार, सेनेचे उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, नागनाथ वाडेकर, कैलास येसगे, जयदीप वरखींडे, बालाजी पाटील आंदेगावकर यांच्यासह सर्व पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाचनालयासाठी युवकांनी गाठले थेट उपविभागीय अधिकाऱ्याचे दालन ; विद्यार्थ्यांचा उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**




शासनाचा वाचन संस्कृती संवर्धनासाठी प्रेरणादायी असलेला 'गांव तेथे ग्रंथालय' उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतींनी सार्वजनिक ग्रंथालय साकारणे गरजेचे आहे. परंतु याकडे दुर्लक्ष होत असून बहुसंख्य ग्रामपंचायत, गावात सार्वजनिक ग्रंथालये नाहीत.राज्य शासनाची 'गाव तिथे ग्रंथालय' या योजनेची मागील काही महिन्यांपूर्वी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी घोषणा केली होती की गाव तिथे ग्रंथालय ही योजना आता मोठ्या प्रमाणावर अमलात आणणार आहोत आणि त्याप्रमाणे सर्वांना आदेशही देण्यात आले होते. परंतु ग्रामपंचायतीद्वारे याकडे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. त्याच अनुषंगाने भोकरदन तालुक्यातील पारध(बु) हे एक मोठे गाव म्हणून ओळखले जाते. परंतु अजून देखील या गावातील युवकांना वाचनालय उपलब्ध नाही . पण हीच खंत गावातील नवतरुण युवक व्यक्त करत आहे. त्याच अनुषंगाने पारध( बु) येथील युवकांनी शासनाच्या गाव तिथे ग्रंथालय या योजनेच्या माध्यमातून गावात ग्रंथालय सुरू करावे यासंबंधीचे निवेदन अनेक विद्यार्थ्यांच्या सहीनिशी ग्रामपंचायत पारध (बु ) दिले असून याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती करण्यात आली आहे.

राज्य शासन, ग्रामविकास विभाग यांच्या शासन निर्णय व राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानाच्या माहिती पुस्तिकेत, तसेच केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीतून लोकोपयोगी विकास कामाच्या यादीतही 'सार्वजनिक वाचनालय' हे प्रमुख उद्देश आहे. वाचन संस्कृतीपासून शालेय विद्यार्थी वंचित राहू नयेत, यासाठी ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या वित्त आयोगाच्या अनुदान माध्यमातून गावांमध्ये सार्वजनिक ग्रंथालय तयार करता येईल. यासाठी ग्रामपंचायतींनी ग्रंथालय साहित्यासाठी आराखड्यात स्वतंत्रपणे तरतूद करावी, असे निवेदनात नमूद केले होते.मात्र पंधरा दिवस उलटून देखील पारध ग्रामपंचायतने कुठलीच कार्यवाही केली नसल्याने पारध येथील सामाजिक कार्यकर्ते सागर देशमुख यांनी मंगळवारी भोकरदनचे उप विभागीय अधिकारी यांना या संदर्भात निवेदन सादर केले. त्यावेळी गंजिधर लोखंडे,किशोर लोखंडे, शिवाजी लोखंडे, राजेश देशमुख,अमोल लोखंडे, उमेश लोखंडे, सागर लोखंडे, राजु लोखंडे, पवन जाधव, यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहे.

> **भोकरदन तालुक्यातील पारध हे गाव संख्येने मोठे आहे पारध चे लोकसंख्या अंदाजे दहा हजार पेक्षा जास्त आहे त्यामुळे पारधला दोन तरी सूरू ग्रंथालय असायला हवी होते पण पारधला एकही ग्रंथालय नाही या कॉम्पिटिशनच्या युगात मुलांना अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र ग्रंथालय असायला हवं, मुलींना सुद्धा आपले आई-वडील बाहेरगावी पाठवू शकत नाही त्यामुळे गावातच ग्रंथालय असायला हवं त्यासाठी ग्रामपंचायतला पंधरा दिवसा अगोदर निवेदनाद्वारे पारध येथे ग्रंथालय सुरु करण्याबाबत देण्यात आले ,होती पण त्यावर कुठलेही ग्रामपंचायतने लक्ष देऊन काम न केल्यामुळे आज उपविभागीय अधिकारी साहेबांना ग्रंथालय संदर्भात निवेदन देण्यात आले.**
>
> **सागर देशमुख ( सामाजिक कार्यकर्ते पारध)**

# वेळू सोसायटीत नागवडे गटाचे नऊ सचालक पुन्हा एकदा अपात्र विभागीय सहनिबंधक

## सहकारी संस्था नाशिकचा आदेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

आ. विक्रमसिंह पाचपुते गट वर्चस्व गाजवणा श्रीगोंदा तालुक्यातील राजकीय वादळ संबोधले जाणाऱ्या वेळू येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था येथील ९ संचालकांनी थकीत कर्ज झाल्यान यांच्यावर महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अन्वये अपात्रतेची कारवाई करण्यात आली असून त्यांच्या अपात्रतेचा आदेश श्रीगोंदा सहाय्यक निबंधक यांनी दिला यापूर्वी दिनांक २०/९/२०२४ दिला होता.

श्रीगोंदा तालुक्यातील वेळू येथील विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित वेळू येथील सोसायटीमध्ये संचालकच मोठ्या प्रमाणात थकीत असल्याबाबतची तक्रार वेळू या गावातील सामान्य नागरिक व भाजपचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांचे विश्वसनीय कार्यकर्ते वैभव अरुण साळुंखे यांनी सहायक निबंध कार्यालय श्रीगोंदा यांच्याकडे तक्रार केली होती त्यावर त्यानुसार तेथील संचालक यांचे सातबारे उतारे यासह इतर माहिती मागविण्यात आली त्यानुसार संचालक बन्सी बाबुराव पाचरणे यांच्याकडे ८७हजार ५००, संजय लक्ष्मण पायमोडे २ लाख ५ हजार, दत्तात्रय बबन पिंपळे २लाख ७३हजार ११५, देविदास शिवाजी औटी २लाख २७५००, नामदेव कान्ह येडे १ लाख ७२५००, बाळू बापू काळे १लाख ३२५००, कृष्णा पार्वती हराळ ८६ हजार २५०, शिंदे सुरेश सखाराम ८७हजार ५००, विमल धनंजय पिंपळे २ लाख ८७ हजार ५०० रुपये संचालक थकबाकी मध्ये असल्याची तक्रार वैभव अरुण साळुंखे रा वेळू यांनी सहाय्यक निबंधक कार्यालयात केल्यावर त्याच्या सातबारा उताऱ्याची चौकशी करण्यात आली.त्यानुसार सोसायटी मधील १३ पैकी तब्बल नऊ संचालक थकीत असल्याचे सहाय्यक निबंध कार्यालयाच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी त्यांच्यावर संचालक असताना कर्ज परतफेड करण्यास कसूर केल्याचा ठपका ठेवत कारवाईचा बडगा उगारत त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई केली आहे त्यामुळे त्यांना संचालक पदाववरून अपात्र करण्यात असल्याचे पोटकलम दोन अन्वये संचालक म्हणून निरह झाल्याने व त्यांची संचालक पदे रिक्त म्हणून घोषित करण्यात आल्याचा आदेश अभिमान थोरात सहाय्यक निबंधक सहकारी संस्था श्रीगोंदा यांनी पारित केल्यामुळे वेळू सोसायटी चे नऊ संचालक आपत्र करण्यात आले होते. त्याच्यानंतर अपात्र संचालक श्री. चंद्रकांत बबन पिंपळे यांनी त्यांच्यासह बाकीच्या आठ संचालकांनी नाशिक येथे धाव घेत अर्ज दाखल केला. पण नाशिक विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांनी देखील संचालकांच्या अपत्रेची कारवाई टलेळ अशी अपेक्षा होती पण श्रीगोंदा येथील सहाय्यक निबंधकांचा आदेश कायम करीत विरोधक असलेले भाजपचे वैभव साळुंखे यांच्या सारखा निकाल नाशिक येथून विभागीय सहनिबंधक संभाजी निकम यांनी दिला आहे. त्यामुळे वेळू येथील सोसायटी हा चर्चेचा विषय झाला आहे या निकालामुळे मात्र आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या गटाचे वर्चस्व वाढले आहे . त्यामुळे सोसायटीचे नऊ संचालक कार्यरत नाहीत.त्यामुळे तालुक्यातील अनेक संस्थेमधील संचालकांनी बोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे तालुक्यातील बाकी सोसायटीचे संचालक याचा बोध घेणार का.नाहीतर अपात्रतेची कारवाईला सामोरे जावेच लागणार यात काही शंका नाही असेही साळुंखे यांनी सांगितले.

# महावितरणमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । गौतम बनसोडे**

नांदेड दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी महावितरण कार्यालययाच्या प्रांगणात शिवशंभु वीज प्रतिष्ठान तथा महावितरण महापारेशन अधिकारी कर्मचारी यांच्या वतीने शिवजयंती मोठ्या थाटात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महापारेशन कंपनी चे संचालक (संचलन ) सतीश चव्हाण तर उदघाटक म्हणून दत्तात्रय पडळकर कार्यकारी संचालक वितरण कंपनी हे उपस्थित होते, प्रमुख पाहुणे म्हणून नासिर कादरी मुख्य अभियंता पारेशन छ संभाजी नगर, राजाराम माने, मुख्य अभियंता नांदेड परिमंडळ, अधीक्षक अभियंता पारेशन कांबळे , सुधाकर जाधव अधीक्षक अभियंता महावितरण मंडळ कार्यालय नांदेड, प्रदीप सातपुते सहायक महाव्यवस्थापक परिमंडळ नांदेड, उपस्थित होते.या कार्यक्रमात कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर, मुख्य अभियंता राजाराम माने, नाशिक कादरी , अध्यक्षीय भाषणात पारेषण चे कार्यकारी संचालक सतीश चव्हाण व इतर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.तर वक्ते म्हणून राहुल गिरी यांनी शिवछत्रपती यांचे चरित्र आपल्या अमोघ वाणीने उलगडून दाखवलं, तसेच राष्ट्रसिंह शाहीर सुरेश जाधव यांच्या प्रबोधन युक्त शाहिरी पोवड्याने सर्वांची मने जिंकली,, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवशंभू वीज प्रतिष्ठान चे अध्यक्ष महेश पाटील वाघमारे, पांडुरंग बोडके, विधी अधिकारी शैलेंद्र पाटील, यांनी परिश्रम घेतले .सूत्र संचालन श्री डी व्ही मिसाळ व प्राची राठोड यांनी केले तर, प्रास्तविक श्री अंधारे यांनी केले, आभार श्री गिरीश डोणगावकर यांनी मानले, कार्यक्रमांस महावितरण व महापारेशन मधील अधिकारी कर्मचारी, सर्व संघटना पदाधिकारी,कंत्राटदार तसेच महिला व बालक यांची मोठी उपस्थिती होती,

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोपाळवाडा येथे शिवजयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**




जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोपाळवाडा केंद्र माळकौठा ता. मुदखेड येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मुख्यध्यापिका सौ चिंचोरे एस बी यांच्या हस्ते पुष्पहार घालून पूजन करून अभिवादन करण्यात आले तसेच त्यांच्या विचारांना सुद्धा अभिवादन करण्यात आले.त्यानिमित्याने सांस्कृतिक विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .पहिली ते पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भाषणे केली यावेळी योगेश्वरी गायकवाड,आरती हटकर,श्रावणी गव्हाणे, आकाश गव्हाणे, किरण गायकवाड, प्रिया गायकवाड,आदीनी भाषणे केले.एकदम खेळीमेळीच्या वातावरणात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा कार्यक्रम शाळेत संपन्न झाला यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ चिंचोरे एस बी शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष सखुबाई गोविंद तसेच शाळेतील विद्यार्थीनी पालक माता आदी उपस्थित होते

# सेनगाव जिंतूर महामार्गावर भीषण अपघात ;अपघातात एकाचा जागीच मृत्यू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**




सेनगाव जिंतूर महामार्गावर मकोडी पाटी जवळ कारचा व मोटरसायकलचा अपघात झाला असून या अपघातामध्ये मोटरसायकल स्वराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली घटनास्थळी पोलिसांनी धाव घेऊन मोटर सायकल स्वार यांना ग्रामीण रुग्णालय सेनगाव या ठिकाणी नेण्यात आले सदरील फोर व्हीलर वॅग्नर गाडी(चक २२-च६८५९)सेनगाव कडून जिंतूर कडे जात होती तर टू व्हीलर मोटार सायकल जिंतूर कडून सेनगाव कडे येत असताना मकोडी पाटीजवळ हा अपघात झाला असून मयत यांचे नाव गंगाधर शितोळे असल्याची माहिती नागरिकाकडून मिळाली आहे तर पुढील तपास सेनगाव पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात येत आहे,

# आमदार राहुल कुल यांचे दुष्काळी परिस्थितीत देखील शाश्वत पाणी मिळण्याच्या मॉडेलचे पेटंट भारत सरकारकडून प्रकाशित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंड**

दौंड तालुक्याचे आमदार अँड. आमदार राहुल कुल यांच्या रेन वॉटर हार्वेस्टिंग व वेस्ट वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम या विषयावर अनेक गोष्टींचा सखोल अभ्यास करून व योग्य संशोधनातून तयार करून कार्यान्वित असलेल्या जलभरन व जलसंधारण या मॉडेलला पेटंट कार्यालय भारत सरकार यांचेकडून विविध पातळ्यांवर परीक्षण होऊन सदर जलसंधारण व जलभरन मॉडेल चे पेटंट मंजूर करण्यात आले असून ते प्रकाशित झाले आहे.दौंड तालुका हा पर्जन्य छायेच्या प्रदेशात येत असल्याने पर्जन्याचे प्रमाण कमी व पाणी वापराचे प्रमाण जास्त यामध्ये विसंगती घडून येत होती आमदार अँड.आमआहे, राहुल कुल यांनी दौंड तालुक्याच्या प्रत्येक भागाचे परीक्षण केले आहे.दौंड तालुक्याच्या दक्षिणेकडील दुष्काळी भागांमध्ये पावसामुळे पाणी, ओढ़े,नाले,विहिरी तुडुंब भरतात मात्र जमिनीमध्ये मुरणारे पावसाचे पाणी जास्त खोलीपर्यंत पोहोचू शकत नाही. कारण या भागामध्ये बेसॉल्ट या प्रकारचा अग्निजंन्य खडक आढळतो त्यामुळे भूजल रिचार्ज होण्याचे प्रमाण कमी असते व परिणामी उन्हाळ्यामध्ये बऱ्याचशा विहिरी,बोरवेल कोरडे पडतात तसेच पाणी जास्त खोलीवर जात नसल्याने मातीतील क्षार पाण्यात मिसळतात व माती सुद्धा क्षारयुक्त बनते त्याचा एकूणच परिणाम पिकांवर व पिकांच्या उत्पादनावर होतो या दोन्ही गोष्टींचा विचार करून याचे सर्वांगाने संशोधन केले व सदर प्रकल्प राबविला आहे.सध्या दौंड तालुक्यातील केडगाव परिसरामध्ये एक प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असून या प्रकल्पामुळे परिसरातील भूजल पातळी कमालीची उंचावली आहे व त्याचा फायदा सर्वांनाच झालेला आहे सदर प्रकल्पाचे संशोधन करत असताना आमदार अँड.कुल यांनी सुभाष बाबुराव कुल महाविद्यालयातील भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ.अशोक दिवेकर आणि एकनाथ सिताराम दिवेकर महाविद्यालय वरवंड येथील भूगोल विभागाचे प्रा.डॉ.राजेश सुरवसे यांचीही भौगोलिक व भूगर्भशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करण्या करीता मदत झाली आहे.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904